**<u>ठळक बातम्या</u>**

- दीपावलीच्या प्रकाश पर्वात बलिप्रतिपदेचा सण आज सर्वत्र साजरा

- ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. एकनाथ चिटणीस यांचं निधन

- फरार व्यापारी मेहुल चोकसीच्या प्रत्यार्पणाविरोधातली याचिका बेल्जियममधल्या अँटवर्प न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- मराठवाडा आणि विदर्भाचा काही भाग वगळता राज्याच्या बहुतांश जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट

**<><><><><>**

दीपावलीच्या प्रकाश पर्वातला बलिप्रतिपदेचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या सणाच्या दिवशी नवीन खरेदी किंवा उपक्रमांचा प्रारंभ केला जातो. बलिप्रतिपदेनिमित्त शेअर बाजार आज बंद आहेत. उत्तर भारतात या दिवशी गोवर्धन पूजन केलं जातं. उत्तराखंडमधल्या चारधामपैकी गंगोत्रीची कवाडं हिवाळ्यासाठी बंद करण्याचे विधी आजपासून सुरु झाले. लक्ष्मी आणि कुबेर पूजनाचा सण काल सर्वत्र उत्साहानं साजरा झाला. घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये पारंपरिक पद्धतीनं लक्ष्मीपूजन झालं. लक्षवेधक रांगोळ्या, आकर्षक रोषणाई आणि आसमंत उजळून टाकणारी आतषबाजी, असं चैतन्यमयी वातावरण काल सर्वत्र होतं.

राज्याच्या अनेक भागात पावसाच्या जोरदार सरींनी काल हजेरी लावली. त्यामुळे दिवाळीच्या उत्साहावर अनेक ठिकाणी पाणी पडलं.

**<><><><><>**

भारतीय नौदलाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची द्वैवार्षिक परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरु झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग उद्या परिषदेला संबोधित करतील. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर नौदलाच्या युद्धसज्जतेबाबत या परिषदेत विचारविनिमय होईल.

नौदलप्रमुख आणि इतर वरिष्ठ अधिकारी या परिषदेत हिंदी महासागरातल्या सुरक्षास्थितीचा आढावा घेतील.

लष्कर, हवाई दल आणि तटरक्षक दलाबरोबर समन्वयाने हिंदी महासागर आणि प्रशांत महासागर क्षेत्रातल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी तयारी करणं हे नौदलाचं प्रमुख उद्दिष्ट आहे. ही परिषद ३ दिवस चालणार आहे.

**<><><><><>**

देशाची नवीकरणीय ऊर्जा क्षमता २०१४ मध्ये ३५ गिगावॅट्स होती, ती आता पाचपटींनी वाढून १९७ गिगावॅट्सवर पोहोचली आहे. यात मोठ्या जलऊर्जा प्रकल्पांमधून निर्माण झालेल्या ऊर्जेचा समावेश नाही. २०३० पर्यंत बिगरजीवाश्म ऊर्जा क्षमता ५०० गिगावॅट्सपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट असल्याचं नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारताने वन संरक्षणासाठीच्या जागतिक क्रमवारीत नवव्या स्थानावर झेप घेतली आहे. इंडोनेशियात बाली इथं अन्न आणि कृषी संघटनेने ही जागतिक वन संसाधन मूल्यांकन २०२५ क्रमवारी जाहीर केली. सर्वाधिक जास्त वनक्षेत्र विकसित करणाऱ्या देशांना या क्रमवारीत स्थान मिळतं. गेल्या वर्षी या क्रमवारीत भारताला दहावा क्रमांक मिळाला होता. यंदा त्यात सुधारणा झाल्याची माहिती केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी दिली आहे. वन संरक्षण, वनीकरण आणि पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने सरकारने सुरू केलेल्या विविध उपक्रमांचं हे यश असल्याचं यादव म्हणाले.

**<><><><><>**

भारतातल्या किरकोळ विक्री क्षेत्रानं यावर्षी नवरात्र ते दिवाळी दरम्यान सणासुदीच्या हंगामातील सर्वाधिक विक्री नोंदवली. यामध्ये अभूतपूर्व ५ लाख ४० हजार कोटी रुपयांच्या वस्तू आणि ६५ हजार कोटी रुपयांच्या सेवांची उलाढाल झाली. अखिल भारतीय व्यापारी महासंघानं केलेल्या देशव्यापी सर्वेक्षणात, याच कालावधीत एकंदर उलाढाल गेल्या वर्षीच्या तुलनेत २५ टक्क्यांनी वाढल्याचं दिसून आलं आहे. प्रामुख्यानं GST दरांमध्ये घट झाल्यामुळं ही वाढ झाली आहे. मिठाई, गृहसजावट, पादत्राणं, तयार कपडे, ग्राहकोपयोगी

आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंच्या किंमती सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यात आल्या आहेत आणि खरेदीचा वेग वाढला आहे.

<><><><><>

ज्येष्ठ अंतराळ शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. एकनाथ चिटणीस यांचं आज सकाळी पुण्यात निधन झालं. ते १०० वर्षांचे होते. इस्रोच्या जडणघडणीत त्यांनी मोलाचं योगदान दिलं होतं. डॉ. होमी भाभा यांच्यासह भारतीय अवकाश कार्यक्रमाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये त्यांचा समावेश होतो. देशातला इन्सॅट हा पहिला दूरसंचार उपग्रह बनवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. श्रीहरीकोटा आणि थुंबा इथल्या प्रक्षेपण केंद्राची जागा निवडण्यात त्यांनी पुढाकार घेतला. १९७० च्या दशकापासून त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे १९९० च्या दशकात देशात खेडोपाडी टीव्ही पोचले. उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

<><><><><>

फरार व्यापारी मेहुल चोकसीच्या भारतात प्रत्यार्पणाविरोधातली याचिका अँटवर्प इथल्या अपील न्यायालयानं आज फेटाळली. १३ हजार कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणी तो मुख्य आरोपी आहे. त्याचं नागरिकत्व हा त्याच्या भारतात प्रत्यार्पणात अडथळा नाही, असा निर्वाळा न्यायालयानं दिला. मेहुल चोकसीची याचिका न्यायालयानं फेटाळल्यानंतर आता त्याच्यासमोर बेल्जियमच्या सर्वोच्च न्यायालयात याचिका करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. तो जर अयशस्वी झाला, तर बेल्जियम सरकार त्याचं भारताकडे प्रत्यार्पण करेल. भारतात आल्यानंतर गुन्हेगारी कट, फसवणूक आणि आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांचा सामना त्याला करावा लागेल.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी येत्या ६ नोव्हेंबरला मतदान होणार असून, निवडणूक प्रचारानं जोर धरला आहे. सत्ताधारी आणि विरोधी दोन्ही पक्षांकडून मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक आश्वासनं दिली जात आहेत.

महाआघाडी सत्तेत आली तर स्वयंसहायता गटांशी संबंधित जीविका दीदी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सरकारी नोकरी देण्याचं आश्वासन राष्ट्रीय जनता दलाचे

नेते तेजस्वी प्रसाद यादव यांनी दिलं आहे. स्वयंसहायता गटांशी जोडलेल्या प्रत्येक जीविका दीदीला आरोग्य विमा आणि इतर लाभांसह दरमहा ३० हजार रुपये वेतन देण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं आहे.

दुसरीकडे राष्ट्रीय लोकशाही आघाडी पुन्हा सत्तेत आली, तर राज्याच्या विकासाच्या गतीला आणखी वेग दिला जाईल असं आश्वासन भाजपाचे नेते देत आहेत.

दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि पक्षाचे निवडणूक निरीक्षक अशोक गेहलोत आज प्रचाराच्या धोरणासंदर्भात महाआघाडीच्या नेत्यांसोबत चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

केंद्रीय गृह मंत्रालयाची उच्चाधिकार समिती आज नवी दिल्लीत विविध मुद्द्यांवर लडाखच्या नेत्यांशी चर्चा करत आहे. गेल्या महिन्यात लडाखमधे झालेल्या हिंसाचारानंतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर पहिल्यांदाच औपचारिक चर्चा होत आहे. याचर्चेत लडाखचं शिष्टमंडळ राज्याचा दर्जा आणि सहाव्या सूचीत समावेश यासारख्या मागण्या मांडण्याची शक्यता असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या चर्चेत कारगिल लोकशाही आघाडी, लेहमधल्या आंदोलनकर्त्यांच्या शिखर संस्थेचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी नागपूरच्या आकाशवाणी, दूरदर्शनच्या तसंच पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोच्या कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. आकाशवाणीच्या माध्यमातून जाहिरात संकलनाच्या कार्याला गती देण्याचे निर्देश त्यांनी सबंधित अधिकाऱ्यांना दिले तसंच निवृत्ती वेतन संदर्भात त्रुटींचे निराकरण करण्याचं आश्वासन दिलं.

**<><><><><>**

ऑलिंपिक स्पर्धेत दोन वेळा पदक जिंकणारा भालाफेकपटू नीरज चोप्रा याला भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्या उपस्थितीत आज नवी दिल्ली इथे हा समारंभ झाला. त्यांनी नीरज चोप्रा याच्या लष्करी गणवेशावर नवीन पदाचं चिन्ह लावून त्याला अधिकृतपणे बढती दिली. ऑगस्ट २०१६मध्ये चोप्रा याला भारतीय सैन्यात नायब सुभेदार

पदावर ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर म्हणून रुजू करण्यात आलं होतं. त्याला मिळालेल्या अर्जुन पुरस्कार आणि खेलरत्न पुरस्कारानंतर २०२१मध्ये सुभेदार पदावरही बढती मिळाली होती. २०२२मध्ये भारतीय सैन्यातर्फे देण्यात येणारं परम विशिष्ट सेवा पदक देण्यात आलं तसंच सुभेदार मेजर पदावरही बढती देण्यात आली होती.

<><><><><>

महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात सामना सुरू आहे. इंदूरच्या होळकर मैदानावर हा सामना होतोय. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. दोन्ही संघांचं उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित झाल्यानं दोघांसमोरही गुण कमवण्याचा ताण नाही. दुखापतीमुळं ऑस्ट्रेलियाची महत्त्वाची फलंदाज अलिसा हिली या सामन्यात खेळणार नाही.

<><><><><>

हिंगोली जिल्ह्यातीलल्या वसमत – परभणी मार्गावरच्या तेलगाव फाट्याजवळ काल रात्री झालेल्या अपघातात ३ जण ठार तर २ जण गंभीर जखमी झाले आहेत. एक चारचाकी आणि ऑटो यांच्यात टक्कर झाल्यानं हा अपघात घडला. जखमींवर नांदेडमधल्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

<><><><><>

मराठवाडा आणि विदर्भाचा काही भाग वगळता राज्याच्या बहुतांश भागासाठी हवामान विभागानं आज आणि उद्यासाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. या काळात राज्यात अनेक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे. तर काही ठिकाणी विजांचा कडकडाट तसंच सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता देखील वर्तवली आहे.

//<><><><><>//